संदर्भ: महाराष्ट्र टाइम्स आवृत्ती : पुणे प्लस दि. ८ जानेवारी २०१९ पान नं. १

# निवड होऊनही नियुक्ती नाहीच

## कर सहायकपदाच्या उमेदवारांना फटका

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) कर सहायकपदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेतून अंतिम निवड झालेल्या २९६ उमेदवारांची नियुक्ती केवळ पडताळणीच्या तांत्रिक कारणामुळे वर्षभरापासून रखडली आहे. या परीक्षेबरोबरच झालेल्या लिपिक आणि राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक पदासाठी झालेल्या परीक्षेतील विद्यार्थ्यांना नियुक्ती मिळाली, मग आमच्या नियुक्तीला विलंब का, असा प्रश्न नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी उपस्थित केला आहे.

एमपीएससीने कर सहायक पदासाठीची पूर्व परीक्षा २० ऑगस्ट २०१७ रोजी झाली. त्यानंतर ३१ डिसेंबर २०१७ रोजी मुख्य परीक्षा झाली. या परीक्षेचा २० एप्रिलला निकाल लागला. त्यातून २९६ उमेदवारांची निवड करण्यात आली. त्यानंतर या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणीही करण्यात आली. निकाल लागूनही नियुक्तीपत्र न मिळाल्याने उमेदवारांची जवळपास साडेआठ महिने नियुक्ती करण्यात आलेली नाही. वित्त विभागाकडे याबाबतची विचारणा केल्यानंतर आधार कार्डची पडताळणी झाल्यानंतर होईल, एका महिन्यात होईल, अशी मोघम उत्तरे देण्यात आली. मात्र, अजूनही नियुक्ती नाही. नियुक्तीचे काय झाले हे विचारण्यासाठी कर विभागाकडे उमेदवारांनी चकरा मारल्या. मात्र, काहीच कार्यवाही करण्यात आली नाही, अशी माहिती दशरथ झणकर, अतुल राजपूत, नीलेश रासकर, अमोल सरडे, शिवदास सोनवणे यांनी दिली.

निवड झाल्यानंतर काही उमेदवारांनी नोकरी सोडली. आता नियुक्ती रखडल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. चार वर्षे तयारी करूनही पदरी निराशाच पडत आहे. आमच्याबरोबरच लिपिक पदासाठी सुमारे तीनशे आणि राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक पदासाठी सुमारे तीनशे उमेदवारांची निवड झाली होती. या उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली. मग आमच्या नियक्तीला विलंब का, नियुक्ती रखडल्याने कुटुंबीयांकडूनही प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत, त्याची उत्तरे देता येत नाहीत. आमची मानसिक आणि आर्थिक ओढाताण होत आहे. त्यामुळे या पदांची नियुक्ती देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे उमेदवारांनी सांगितले.

निवड प्रक्रियेत उमेदवारांनी ओळखपत्र म्हणून आधार कार्ड दिले, तर काही उमेदवारांनी आधार कार्डऐवजी इतर छायाचित्रे असणारी ओळखपत्रे दिली. आधार कार्ड दिलेल्या उमेदवारांच्या पडताळणीत समस्या येत आहेत, असा आरोप उमेदवारांनी केला.